एक दिवस

एक दिवस असा असावा, दुःखाचा लवलेश नसावा
काजव्याचा चंद्र व्हावा, चांदण्यांचा सडा असावा

असतात व्याप कितीक, मर्यादा ही बऱ्याच
बदलेल आयुष्य असे, बासरीचा सूर व्हावा

कुणी नसते सोबत, कुणी टाळतो सहज
मित्र संगती असता, आयुष्याचा चाफा व्हावा

कुठे कधी सहचर, कोणी सोबत मिळतो
निर्मळ सहचर असा, आयुष्याचा श्रावण व्हावा

नाते कुठलेही मग, स्वार्थासाठी न वेळ
जोडले गेले जे, तरल मृदगंध असावा

सारांश निघेल उतारवेळी, हिशोबही चुकते होती
स्मरणात सर्वांच्या येता, आयुष्याचा सार व्हावा

© सपु
www.saarthbodh.com

सचिन कुलकर्णी